आर.सी.सी. ५७/२०१९
सरकार वि. लक्ष्मण
नि.क्र. १५

**सरकार तर्फे साक्षदार कमांक ३ याची जबानी**
**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि,**
**नाव** :- श्री. दिलीप ईश्वर सिंधीमेश्राम,
**वय** :- २२ वर्षे **व्यवसाय** :- वनमजुरी
**राहणार :**- गोवरी, तह. मौदा, जि. नागपूर
-------------------------------------

**<u>सरतपास शपथेवर सरकार तर्फे ॲड. श्री.एम.एम. पाटणकर यांचे व्दारा</u>**

मी आरोपीस ओळखतो. जख्मी ईश्वर माझे वडिल आहेत. घटना ही अंदाजे ६ ते ७ महिन्यांपूर्वी सायंकाळी ७ ते ७.३० चे दरम्यान गोवरी या गावातील बाजार चौकात घडली होती. त्यावेळी मी माझे घरी होतो. तेव्हा मला माझे काकाचे मुलगी माझे वडिलांना आरोपी लक्ष्मण याने मारहाण केल्याचे सांगत आली. त्यामुळे मी तेथे गेलो असता माझे वडिल पडलेले दिसले. त्यामुळे मी माझे वडिलांना उठवून गाडी बोलावून पोलीस स्टेशन मौदा येथे आणले होते. तिथे माझे वडिलांनी फिर्याद दिली होती. तेथून माझे वडिलांना मौदा येथील सरकारी दवाखान्यामध्ये पाठविले व तेथून नागपूर येथील मेडिकल हॉस्पीटल येथे पाठविले. माझे वडिलांचे डोक्यावर मागच्या बाजुने मार लागला होता. त्यामुळे त्यांचे डोक्याला ६ ते ७ टाके लागले होते. आरोपी व माझे वडिलांमध्ये माझा लहान भाउ जितेन्द्र याचे सायकल संबंधी वाद झाला होता. आरोपी लक्ष्मण याने माझे भावाचे सायकलला थांबविले होते व त्याला मारण्याची धमकी दिली होती. त्यामुळे सदर घटना ही त्या घटनेच्या १५ दिवसानंतर घडलेली होती. घटनेच्या दिवशी माझे वडिल माझे मुलीसाठी बाजार चौकात खाउ घेणेकरीता गेले होते. तेव्हा तीथे आरोपीने येवून माझे वडिलांना पाडून बोल्डरने (दगडाने) मारले होते. पोलीसांनी माझे बयान घेतले होते.

आर.सी.सी. ५७/२०१९
सरकार वि. लक्ष्मण
नि.क्र. १५

**उलट तपास आरोपी तर्फे श्री. ए.एस.रेवतकर यांचे व्दारा**

आमचे गावातील बाजार शनिवार या दिवशी राहतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशी आजु बाजूच्या गावातील लोक तिथे बाजारासाठी येतात. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडिल बाजाराचे दिवशी कधी कधी दारु पितात. आरोपी लक्ष्मण माझे वडिलांस मारहाण करीत असल्याचे माझी काकाची मुलगी मला सांगत आल्याचे मी पोलीसांना सांगीतले होते. सदर बाब माझे बयानात का नमुद नाही याचे कारण मला सांगता येत नाही. मी माझे वडिलांना पोलीस स्टेशन येथे आणल्याचे बयान देते वेळी पोलीसांना सांगीतले नव्हते. घटनेच्या आधी १५ दिवस अगोदर आरोपी लक्ष्मण याने माझा भाउ जितेन्द्र याची सायकल अडविली होती व त्याला मारण्याची धमकी दिली होती, घटनेच्या दिवशी माझे वडिल माझे मुलीसाठी खाउ

घेण्यास गेले होते हे मी पोलीसांना सांगीतले होते किंवा नाही ते आठवत नाही. माझे वडिलांस आरोपीने बोल्डरने मारल्याचे मी पोलीसांना सांगीतले होते. दगड व बोल्डर ही एकाच वस्तुची नावे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळी तिथे शाळेचे बांधकाम चालु होते व तिथे गिट्टी पडली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या दिवशी माझे वडिल दारु पिवून असल्याने, पडल्याने त्यांना गिट्टीचा मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील आरोपीविरुध्दचा मजकूर खोटा सांगत आहे.

**उलटतपास पूर्ण**

**फेरतपास नाही**

श्रवणोत्तर स्विकृत

समक्ष

Digitally signed by Santosh Pundlikrao Wankhade
Location: Mouda
Date: 2021.03.18 16:43:19 +0530

दिनांक: ०९/०३/२०२१

(एस.पी.वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
मौदा.